आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे

# आदर्श कला आणि वाणिज्य महाविद्यालय

कुळगांव – बदलापूर

## महाविद्यालीन राज्यस्तरीय स्पर्धा

*' पुस्तकावर बोलू काही......'*

भारत रत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या १५ ऑक्टोबर हा जन्मदिन 'वाचन प्रेरणा दिन' म्हणुन साजरा केला जातो. त्या निमित्ताने ग्रंथालय विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या 'पुस्तकावर बोलू काही' या संकल्पनेवर आधारित 'पुस्तक परिक्षण' राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

ही स्पर्धा महाराष्ट्र राज्यापूर्ती मर्यादित न राहता ही राष्ट्रीय स्तरीय स्पर्धा झाली. या स्पर्धेकरिता गोवा या राज्यातून एका विद्यार्थिनीने सहभाग घेतला. या स्पर्धेत एकूण १६ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. यात पुणे, कोपरगाव, नंदुरबार, सांगली, ठाणे, मुंबई जळगाव, अश्या अनेक जिल्यातून विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून 'पुस्तकावर बोलू काही' या संकल्पनेवर आधारित चरित्र किंवा आत्मचरित्र पुस्तकाचे परीक्षणाचे व्हिडीओ पाठविण्यात आला. त्या व्हिडीओचे परीक्षकाच्या द्वारे निकाल देण्यात आला. निकाल खालील प्रमाणे -

| अ क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | महाविद्यालयाचे नाव | क्रमांक | बक्षिसाचे स्वरूप |
|---|---|---|---|---|
| 1 | कु. देसाई राशी रामदास | गोवा कॉलेज ऑफ फार्मसी पणजी | प्रथम क्रमांक | रु. १०००/- व प्रमाणपत्र |
| 2 | कु. लाड परेश रघुनाथ | आदर्श महाविद्यालय कुळगांव – बदलापूर | द्वितीय क्रमांक | रु. ७५०/- व प्रमाणपत्र |
| 3 | कु. सावंत सिद्धी अजित | फर्ग्युसन कॉलेज, पुणे | तृतीय क्रमांक | रु. ५००/- /- व प्रमाणपत्र |
| 4 | कु. काटंमवरे स्नेहल भाऊसाहेब | के.जे.सोमय्या कॉलेज, कोपरगाव | उतेजनार्थ | रु. ३००/- व प्रमाणपत्र |
| 5 | कु. गुडाळे नम्रता पद्मराज | कन्या महाविद्यालय, मिरज | उतेजनार्थ | रु. ३००/- व प्रमाणपत्र |

एकूण पाच बक्षिसे घोषित करण्यात आले. सर्व सहभागी स्पर्धकांना ई प्रमाणपत्र व विजेत्या स्पर्धकांना रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात आले. या कार्यक्रमासाठी सर्व महाविद्यालय नियामक मंडळाचे सदस्य व प्र-प्राचार्या मा. डॉ. संगिता पांडे यांनी हि स्पर्धा आयोजन करण्यासाठी मान्यता देऊन प्रोत्साहित केले त्या बद्दल सर्व पदाधिकाऱ्यांचे मनपूर्वक आभार.

श्री.लक्ष्मीकांत सातपुते

ग्रंथपाल

आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे

आदर्श कला आणि वाणिज्य महाविद्यालय

कुळगांव-बादलापुर

## राष्ट्रीय युवा दिन

## अहवाल

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये १२ जानेवारी हा दिवस स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त 'राष्ट्रीय युवा दिन' म्हणून साजरा केला जातो याचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या ग्रंथालयामार्फत ऑनलाईनच्या माध्यमातून विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात निबंध स्पर्धा, पुस्तक परीक्षण आणि युवा प्रश्न मंजुषा अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. निबंध स्पर्धेसाठी तरुणांचे प्रेरणास्थानः स्वामी विवेकानंद हा विषय देण्यात आला होता. या स्पर्धेत एकूण १५ विद्यार्थ्यांनी निबंध ई-मेलव्दारे पाठविण्यात आले. यात ३ उत्कृष्ट स्पर्धकांना पारितोषिक देण्यात आली होती.

पुस्तक परीक्षण स्पर्धेकरिता आपण वाचलेल्या कोणत्याही एका पुस्तकाचे परीक्षण करणे. या स्पर्धेत ४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यात उत्कृष्ट स्पर्धकाला पारितोषिक देण्यात आले.

तर हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्र-प्राचार्या, प्रा. मंदार ठाकूर तसेचह वरिष्ठ सहका-यांचे मार्गदर्शन मिळाले.

(Salpute L.M.)